International Journal of Academic Research and Development
ISSN: 2455-4197, Impact Factor: RJIF 5.22
www.newresearchjournal.com/academic
Volume 1; Issue 3; March 2016; Page No. 69-72

# विकास प्रशासनः दशा आणि दिशांचा विश्लेषणात्मक अभ्यास

डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव

प्रा. विभाज प्रमुज व संशोध-न मार्जदर्शज पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख देगलूर महाविद्यालय, देगलूर.

## प्रस्तावनाः

सामाजिक शास्त्रापैकी लोकप्रशासन हे एक अत्यंत महत्वपूर्ण सामाजिकशास्त्र आहे. जे शासन व्यवस्थेने घेतलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणी प्रक्रियेशी संबंधीत घटकांचा अभ्यास करते. जागतिकीकरणाच्या रेट्यात लोकप्रशासन या विद्याशाखेत आमुलाग्र बदल झाले. ज्या अंतर्गत नवनवीन अभ्यासशाखांचा उदय झाला. त्यापैकीच एक विकास प्रशासन ही महत्वाची अभ्यासशाखा आहे. जी कोणत्याही देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व प्रशासकीय विकासाशी संबंधीत आहे. ती एक बहुआयामी अभ्यासशाखा आहे. नागरिकांचा विकास, समाजाची प्रगती आणि राष्ट्राच्या विविध योजनांना यशस्वी बनवण्यासाठी सदैव तत्पर असते. विकास प्रशासन सदैव मार्गक्रमीत होणारी गतिशील, परिवर्तनशील, लक्ष्योन्मुखी व जनसहभागी संकल्पना आहे. ज्यात लोककल्याण व विकासात्मक कार्यास सर्वोच्च प्राथमिकता दिली जाते. सर्व विकसनशील देशांचे विकास प्रशासन प्रामुख्याने आर्थिक नियोजनाच्या माध्यमातून लोकांच्या राहणीमान स्तरास सुधारणे, राष्ट्रीय उत्पन्नात व चलनात वाढ करणे, सामाजिक न्याय आणि आधुनिकीकरणाच्या ध्येयास गाठण्याचा सदैव प्रयत्न करतो. आजच्या युगात विकास प्रशासन राष्ट्र निर्माण आणि विकासाचा पर्याय बनले आहे. विकास प्रशासनाच्या कार्यक्षेत्रास सुचीबध्द करणे आणि त्याच्या मर्यादांना निर्धारित करणे अशक्य आहे. आज प्रशासकीय सुविधांची गरज लोकांना, जीवनाच्या प्रत्येक वळजावर पडत आहे. आजच्या प्रशासनासमोर अनेक उद्देश आहेत. ज्यात कार्यकुशाग्रता, निष्पक्षता, मितव्ययता, प्रभावशीलता आणि लोकांच्या इच्छेला खरे उतरणे इत्यादी प्रमुख आहेत. प्रशासनाला एक नवीन स्वरुप प्राप्त झाले.

आज सातत्याने हा आग्रह केला जातो की, प्रशासकाने स्वतःस समाजसेवक समजावे. जनसामान्यांच्या संपर्कात राहून जनसहभागीत्व व उत्तम समन्वयासहित विकासपुरक व लोककल्याणाच्या योजना व ज र्यज्र मांचे समयबध्द व संपूर्ण क्रियान्वीता सुनिश्चित करावे. लोककल्याणकारी राज्य व विकासाच्या संकल्पनेचा प्रभाव आज सर्वत्र दृष्टिगोचर आहे. मानवी जीवनाचा स्तर उंचावणे आणि राष्ट्रांत आमुलाग्र बदल करण्याचे स्वप्न शासन, प्रशासन आणि जनतेच्या परस्पर सहकार्यानेच पुर्ण होवू शकतो. वर्तमानकाळात विकासाच्या प्रक्रियेस तीव्र गती देणे आणि अधिकाधिक व्यापक बनवण्यावर जोर दिला जातो. विकास सर्व देशांच्या प्रशासकीय गतीविषयीचा केंद्रबिंदू बनला आहे. आधुनिक शासन व्यवस्था आणि प्रशासन प्रणालीचे मूलभूत उत्तरदायित्व लोककल्याण व विकासास गतिप्राप्त करणारे बनले. केंद्र आणि राज्यशासनामार्फत बनवलेले धोरज, ज र्यज्र म व योजनांना ग्रामीण स्तरापर्यंत लागू करण्यात जिल्हा प्रशासनाची स्पष्ट व महत्वाची आणि अविश्वसनीय भुमिका आहे. आजच्याप्रमाणे भविष्यातही प्रशासनाचा केंद्रबिंदू मानवी कल्याणच असेल. ज्यामुळे लोकसहभागीत्व आणि विकेंद्रीकरणाचे महत्व वाढत आहे. त्यासोबतच लोकसेवकांचे उत्तरदायित्व दिवसेंदिवस वाढत आहे. आर्थिक, सामाजिक व राजकीय समता आणणे व जीवन स्तरात तीव्र सुधारणा करण्यासाठी सर्व स्तरावर जनसामान्यांची जागरुकता व सहकार्याची आवश्यकता आहे. लोकशाहीत प्रशासन जनसामान्यांच्या सेवेसाठी काम करते. ते व्यक्तिच्या जन्मापासून मृत्युपर्यंत त्यांचे कल्याण व विकासाशी निगडीत असते. वर्तमानकाळात प्रशासनाचे स्वरुप सदैव नियमापासून दूर जावून विकासपूरक होत आहे. देशाच्या वाढत्या विकासास पाहता विकास संस्थांचे जाळे सर्वत्र पसरलेले आहे. तसेच सत्तेच्या सर्वोच्च शिजरापासून ते आम जनतेपर्यंत सर्वचजण विकास प्रशासनाच्या विकासात्मक कार्यात सहभागी झाले आहेत.

शासनामार्फत संचलित विभिन्न लोककल्याणकारी आणि विकासपुरक योजना व कार्यक्रमाचा लाभ देशातील मागास क्षेत्र व गरजवंत लोकांपर्यंत पोहोचला आहे. परंतू ज्याप्रमाणात विकासाचे ध्येयच निर्धारित केले होते. विशाल रक्कम खर्च केली त्या तुलनेत यशस्वीता प्राप्त झाली नाही. विकास प्रशासनाच्या मार्गात अनेक अशा अडचणी येतात ज्यामुळे विकासासाठी होणाऱ्या प्रयत्नांच्या अपेक्षेनुरुप योग्य परिणाम मिळत नाहीत. विकास प्रशासनाच्या दशा आणि दिशांचे अवलोकन मुख्यतः प्रशासकीय, राजकीय, आर्थिक, सामाजिक, -नैसर्गिक या अंगाने करावे लागेल.

### अ) राजकीय दशाः

राजकीय अस्थिरता हा भारतासह जगातील सर्व विकसनशील देशाची समस्या आहे. यात केंद्र व राज्य शासनात वारंवार फेरफार होतो. अशा अस्थिर राजकीय वातावरणात विकास कार्याला यशस्वी करण्यात अनेक अडचणी उत्पन्न होतात. नौकरवर्ग सदैव धोरण व योजनांच्या स्थिरतेला प्राधान्य देतात. परंतु जेंव्हा शासनच अस्थिर बनते तेंव्हा स्थिर धोरण व योजना कशा चालतील ? या स्थितीत नौकरशाही जुन्या शासनाच्या धोरण व योजनांना चालू ठेवत नाहीत. वास्तवतेत यांना चालु ठेवण्याच्या मनस्थितीत वर्तमान शासन नसते. यामुळेच विकास कार्य अपुर्ण राहते. देशात व राज्यात राजकीय स्थिरता कायम ठेवणे आवश्यक आहे. जेणेकरुन कार्याला गती मिळेल. त्यासाठीच सध्याचे नरेंद्र मोदी शासन एक देश एक निवडणूक हा नवीन कायदा बनवण्याच्या प्रयत्नांत आहे. लोकशाहीत सर्वांत बिकट समस्या राजकीय पक्षाचे नेता आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांत सामंजस्य व समन्वयाचा अभाव असणे आहे. सदैव हे अनुभवास येते की, नेता लोक आपले व्यक्तिगत अथवा पक्षीय हिताच्या पूर्तीसाठी शासकीय कार्यात अयोग्य राजकीय हस्तक्षेप करतात. ज्यामुळे लोककल्याण व विकासात्मक कार्यात सदैव अडचणी येतात. मागील दशकांत राजकारण्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बढती व बदल्यांत आपला प्रभाव व वर्चस्व राजज्यात यशस्वी राहीले. परिणामतः प्रशासनामार्फत धोरण व कार्यक्रमास कार्यान्वित करुन त्याचा संपूर्ण लाभ जनतेपर्यंत पोहोचण्यात अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. आज स्थिती अशी आहे की, शासन वर्ग खुलेआम प्रशासनास नियंत्रणात ठेवू इच्छितात. प्रशासकीय यंत्रणेत भ्रष्टाचाराचे वाढणे एक प्रमुख कारण राजकीय यंत्रणेतील वाढता भ्रष्टाचार आहे. भ्रष्ट राजकारणी भ्रष्ट नौकरवर्गाच्या सहकार्याने मनमानी करण्यात गुंग आहेत. सत्तेत टिकून राहण्यासाठी लागणारा पैसा बदल्या, नियुक्त्या, वीजचोऱ्यांचे संरक्षण, सार्वजनिक योजना आणि घोटाळयातूनच जमा होतो. नौकरवर्ग आणि व्यावसायिकांशिवाय सर्वांत जास्त काळा पैसा राजकीय नेत्यांजवळ असतो. ज्यास ते निवडणूकीत खर्च करतात. काळ्या अर्थव्यवस्थेला



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

रोखण्यात अयशस्वीता विकासात बाध्यकारी होते. सामाजिक क्षेत्रासाठी आवश्यक पैसा जोडविण्यास अनेक अडचणी येतात. संपूर्ण निवडणूक प्रक्रियेस योग्य पध्दतीने चालविण्यासाठी सर्व शासकीय विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची मदत घेतली जाते. निवडणूक प्रक्रियेदरम्यान संपूर्ण विकास कार्याची गती सदैव मंद असते. याशिवाय राजकीय मोर्चा, कर्मचाऱ्यांचे संप, व्यापाऱ्यांचे बंद, शेतकरी चळवळ, जनतेचा विरोध ई. कारणांमुळे पण लोककल्याण व विकासात्मक कार्यात अडथळे व संकटे निर्माण होतात.

ब) आर्थिक दशाः
अर्थ शासनरुपी शरीरातील रक्ताभिसरन असते. ज्याशिवाय जीवनाची कल्पना करता येत नाही. अर्थ प्रशासकीय मशनरीचे इंधन आहे. कोणतेही शासन अर्थाशिवाय कोणतेही कार्य संपन्न करु शकत नाहीत. सर्व प्रशासज ीय, जनकल्याण व विकास कार्यात करण्यासाठी अर्थाची आवश्यकता असतो. संपूर्ण कार्याची मर्यादा निर्धारण उपलब्ध वित्तीय संसाधनाद्वारेच केली जाते. केंद्र व राज्य शासनामार्फत प्रायोजित सर्व योजनांना संपूर्ज अंमलबजावणीची जबाबदारी प्रशासकीय यंत्रणेची होती. वर्तमानकाळात शासन लोककल्याण व विकासात्मक घटनाक्रमावर भरगच्च रक्कम खर्च केली जाते. सर्व शासकीय योजना आपल्या खैराती स्वरुपांमुळे प्रशासन आणि राजकीय नेत्यांना भ्रष्टाचाराची एक मोठी संधी देते. भरगच्च पैसा कोणत्या ना कोणत्या मार्गाने नेते, अधिकारी, इंजिनिअर, ठेकेदार, कर्मचारी या सर्वांच्या खिशात जातो. ज्यामुळे उर्वरित पैसा निर्धारित कार्यासाठी कमी पडतो. जेणेकरुन उर्वरित विकास कार्य अर्धवट राहते. त्यामूळे आम जनतेच्या विकास योजनांचा संपूर्ण लाभ मिळत नाही. आज राजकीय नेते, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि जनतेच्या चरित्र्यात निरंतर घसरण होते. व्यक्तिगत स्वार्थ, सत्ता व शक्तीचा दुरुपयोग, लोकसहभागाचा अभाव इ. कारणांमुळे सर्व परियोजनात निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यास अडथळे उत्पन्न होतात. तसेच खर्चासाठी लागणाऱ्या किंमतीत सातत्याने वाढ होते. याशिवाय प्रशासकीय खर्चात अत्याधिक वाढ नोंदवितात. शासकीय परियोजनांच्या माध्यमातून होणारी लूट ही सर्वश्रुत आहे. कोणत्याही शासकीय परियोजनांची जुंतवणूक जवळपास २०% पैसा समांतरपणे अर्थव्यवस्थेत चालते. या परियोजनांत होणारा विलंब आणि गुंतवणूकीत वृध्दी या तथ्याचे प्रमाण आहे. याशिवाय केंव्हा-केंव्हा देशांच्या वित्तीय संकटाची स्थिती उत्पन्न होते. ज्यामुळे विभिन्न योजनांना कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक धनाची पूर्तता होत नाही व विकास कार्यास बाधा करण्यासारखे आहे.

ज ) प्रशासज ीय दशाः
संपुर्ण जग भ्रष्टाचाराच्या समस्येचा सामना करत आहे. वर्तमानात भ्रष्टाचार प्रशासन आणि समाजाचा अविभाज्य अंग बनला आहे. तसेच दिवसेंदिवस त्यात वाढ होत आहे. भ्रष्टाचाराच्या भस्मासुराने प्रगतीच्या ढाच्यास खोकले बनवले. भ्रष्टाचार सत्तेच्या सर्वोच्च शिजरापासू-न प्रारंभीत होवून निम्नस्तरापर्यंत पसरला आहे. भ्रष्टाचाराचे अनगीनत रुप आहेत. सत्ता व अधिकाराचा दुरुपयोग हा ही एक भ्रष्टाचार आहे. भ्रष्टाचाराचा एक प्रचलित प्रकार शासकीय अधिकारी व ज र्मचाऱ्यांमार्फत सार्वजनिक संपत्तीचा होणारा अपव्यय आहे. नियोजनातील एक फार मोठी रक्कम अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या खिश्यात जाते. त्यामुळे विकासाच्या योजना व कार्यक्रम अपुर्ण राहतात. माजी पंतप्रधान राजीव गांधींनी भ्रष्टाचाराच्या महामारीस ओळखून विधान केले होते की, जनकल्याण आणि विकासाशी निगडीत योजनांसाठी केंद्र शासनामार्फत दिलेल्या रक्कमेचा १५% भागच गरजूवान लोकांपर्यंत पोहोचते, उर्वरित रक्कम नेता, अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार इत्यादींच्या खिशात जाते. आजकाल अशी तक्रार सर्वसामा-य झाली की, अधिकतर शासकीय कार्यालयात कोणतेही कागद किंवा फाईल तोपर्यंत पुढे सरकत नाही. जोपर्यंत व्यक्ती ऑफीसचे चक्कर मारुन प्रत्येक टेबलावर कांही रक्कम देत नाही. प्रशासनात भ्रष्टाचार वाढण्याचे दोन कारण आहेत, गोपनीयता आणि कायदा व प्रक्रियेतील गुंतागुंत. प्रशासकीय अधिकारी औपचारिक नियमांचे कट्टर समर्थक असतात. नियमांचे कठोरतेने पालन करण्याचा परिणाम होतो की, कागदोपत्री काम आणि फाईलींचे आवागमन वाढते, कामात दिरंगाई होते. याच प्रशासकीय दिरंगाईमुळे जनता त्रस्त होते. नौकरवर्गामुळे लालफितशाहीला प्रोत्साहन मिळते. कितीही आवश्यक अथवा जलद कार्य असो नौकरशाही जराही त्याची पर्वा व काळजी करत नाही. याशिवाय अधिकांश सरकारी कर्मचारी असे आहेत, जे तेवढेच काम करु इच्छितात. जेवढे त्यांना पदावर टिकणे व पदोन्नतीसाठी आवश्यक असेल. वर्तमान काळात नौकरशाहचे राजकियीकरण इ ाल्यामुळे कर्मचारी वर्ग सत्ताधारी राजकीय पक्षाच्या हाताची बाहु ली बनते. प्रशासकीय अधिकारी सत्ताधारी राजकीय पक्ष आणि स्थानिक दबावापुढे नेहमीच नतमस्तक होवून कार्य करतात. याशिवाय ते कोणता न कोणता नेता व पक्षाशी एकनिष्ठ होवून सार्वजनिक कार्यात स्वार्थ सिध्दीसाठी एका राजकारण्याप्रमाणे कार्य करु लागतात. जे राजकीय पक्ष सत्तेत असतात त्यांना एकनिष्ठ नौकरशाही हवी असते. तर जे राजकीय पक्ष विरोधी बाकावर असतात ते निष्पक्ष नौकरशाहीची अपेक्षा करतात. अशा स्थितीत नौकरशाही हुशार व चाणाक्ष व्यापाऱ्याप्रमाणे भ्रष्ट व्यवस्थेचा हिस्सा बनतो. प्रशासकीय यंत्रणा आणि त्यांच्या बदल्या एक प्रशासकीय व्यवस्था आहे. परंतू आज बदल्या प्रत्येक स्तरावर राजकारण्यांचे प्रमुख अंग बनले. आपला स्वार्थपूर्ण करण्यांसाठी राजकारणी प्रशासकीय अधिकाऱ्यांची आपल्या मनपसंद ठिकाणी व पदावर लवकरात लवकर बदली करतात. यामुळे जनतेला निष्पक्ष व निडर प्रशासन मिळण्यात अडचणी येतात.

याशिवाय अधिकारीवर्ग पारंपारिक नियमन कार्य आणि नवे अर्जित विकास कार्यास अधिक त्रास व कष्ट घेतल्यानंतरही योग्य व क्षमतावान प्रशासन देण्याच्या स्थितीत येत नाहीत. आमच्या देशाच्या प्रशासनात नाविन्यतेची कमतरता आहे. कारण येथे प्रशासन कोणत्याही प्रकारचे संकट घेण्याच्या मनस्थितीत नसते. ज्यामुळे प्रशासकीय व्यवस्था विकसित स्तरापर्यंत पोहोचण्यात अयशस्वी राहते. आदरणीय स्वर्गीय माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दूल कलामने नाविण्यपूर्ण प्रशासनास विकासाची गुरुकिल्ली मानले. आज आमच्या देशासाठी माहिती तंत्रज्ञ ाान, नाविण्यता, नेतृत्व आणि प्रोत्साहित कार्यबलाचे संमिश्रण आवश्यक आहे. शासनाच्या विभिन्न विभागाच्या गतिविधीत समन्वयाचा अभाव असतो. ज्यामुळे प्रशासनात अडथळे व स्पीडब्रेकर उत्पन्न होतात. समन्वयाच्या मार्गात सर्वात मोठी अडचण प्रशासकीय संघटनाच्या सदस्यात एक सामान्य उद्देशाची अनुभूती आणि सकारात्मक समुहभावनेचा अभाव आहे. संघटन किंवा विभागाचे प्रमुख व उच्च अधिकारी अधिकाधिक शक्ती व सत्ता आपल्या हातात ठेवतात. त्यामुळे अधिनस्थ अधिकारी व कर्मचारी सत्तेचे हस्तांतरण करण्यात अनिच्छा, नाराजी व्यक्त करतात. याशिवाय शासकीय संरचनेचा वाढता विस्तार आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या संख्येत सदैव असंतुलित वाढ आणि उत्तरदायित्वाच्या भावनेतील घसरण समन्वयाच्या अभावासाठी अधिक जिम्मेदार आहे.

लोकशाहीत जनसहभागित्वाशिवाय विकास कार्यात यशस्विता प्राप्त ज रणे शक्य नाही. विकास योजनांच्या प्रभावी क्रियान्वयनासाठी जनतेची भागीदारी एक पूर्व दिशा आहे. त्यामुळेच प्रशासन जनतेच्या आवश्यकता व आकांक्षानुरुप बनवण्यासाठी जनसहभागीत्वावर विशेष भर देत आहे. परंतू जनसहकार्याचा अभाव नियोजन क्रियान्वयनाच्या मार्गातील एक फार मोठा अडथळा आहे. अपेक्षित जनसहभागित्वाशिवाय लोककल्याण व विकासात्मक कार्य मंदगतीने चालते. याशिवाय प्रशासन आणि जनतेत दूरावा किंवा अविश्वासाची भावना विकास कार्याच्या संपादनात अडथळा बनते. आमच्या विकासाच्या योजना अधिक व्यापक व विस्तारजन्य असतात. त्यांच्यावर अंमलबजावणी मंद गतीने होते. क्रियान्वयनाच्या प्रशासकीय तंत्रात नेतृत्वाची कमतरता, तंत्रज्ञानाचा अभाव, प्रबंधकाची अकुशलता, उत्तरदायित्व व नैतिकतेचा अभाव, वेळेचा अभाव, बेपरवाहीचा,

उदासीनता इ.मुळे विकास ज ार्याचे वेळेवर संपन्न होणे कठिण आहे. त्यामुळे अपेक्षित परिणाम नजरेसमोर येत नाहीत. शासनाच्या स्वतःच्या बऱ्याच योजना तर फक्त कागदावरच बनवल्या जातात. शासनाची अंतर्गत परियोजना भ्रष्टाचार आणि अंमलबजावणीची दिरंगाई असते. परंतू आंतरराष्ट्रीय संस्था या प्रकारच्या गोंधळास खपवून घेत नाहीत. परकीय मदतीमुळे चालणाऱ्या योजनात होणाऱ्या जोंधळामुळे दो-ही बाजूने नुकसान होते. योजनेवरील संपूर्ण खर्च वाया जातो. कर्जाचे डोंगर वाढते. याशिवाय परदेशात व आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर देशाची प्रतिमा व प्रतिष्ठा मलीन होते.

ड) सामाजिक दशाः

प्रशासनास फक्त कायद्याच्याच आधारावर चालवता येत नाही. त्यासाठी उु शल संचलन व जनोपयोगी बनवण्यासाठी आज सामाजिक न्याय अधिक आवश्यक बनला. भारतीय सामाजिक परिदृश्यात आपले आदर्श, मूल्य, धर्म, जातीव्यवस्था, रिति-रिवाज, परंपरा, आशा, आकांक्षा इ. तत्व असतात. ज्या प्रशासनाला अधिक प्रभावित करतात. जनतेची साक्षरता आणि जागरुकता प्रशासकीय घटनाक्रमास लोकोपयोगी बनवण्यासाठी सहाय्य करते. आजही देशात संपूर्ण व सुव्यवस्थित शिक्षणाचा अभाव आहे. आमचा समाज रुढीवादी व पारंपारिक असल्यामुळे मागासलेपणाने त्रस्त आहे. ज्यात जनतेत आपल्या अधिकार व कर्तव्याप्रति जागरुकतेचा अभाव स्पष्ट रुपाने दिसतो. शिक्षण व जागरुकतेच्या अभावामुळे शासन व प्रशासनाची इच्छा असूनही जनकल्याण व विकास योजनांचा पर्याप्त लाभ समाजाच्या मागास लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी अपयश आले. वाढती लोकसंख्या हा एक प्रमुख अडथळा आहे. जी विकास घटनाक्रमास नेहमी अपर्याप्त सिध्द करण्यात दंग आहे. थोड्याफार प्रमाणात जी प्रगती देश व समाजास समृध्द करण्याच्या दिशेने केली जाते. त्यास लोकसंख्येतील तीव्र वाढ निकामी करते. याशिवाय जनतेद्वारा आपल्या दायित्वाप्रती सकारात्मक दृष्टिकोनास नाकारुन प्रशासनास योग्य सहकार्य करत नाहीत. उलट आपल्या घरासमोरील कचराही प्रशासनानेच घेवून जावा अशी अपेक्षा आपण करतो. विकासाच्या मार्गातील फार मोठा अडथळा आहे. नागरी जाणिवा व चैतन्याच्या अभावास बाजुला सारुन जनता स्वतः लहान-लहान परंतू महत्वपूर्ण कार्यात आपले बहुमूल्य योगदान देवून विकासाचा मार्ग प्रशस्त करतात. याशिवाय लोकांच्या डोक्यातून राष्ट्रीयत्वाची भावना कमी होत आहे. परिणामतः लोक राष्ट्रीय संपत्तीस आपली संपत्ती न समजुन शासनाची संपत्ती समजतात. त्याचे अयोग्य मार्जाने शोषण व ऱ्हास करण्यास प्रारंभ करतात.

इ) नैसर्गिक दशाः

संकटकालीन परिस्थितीशी सामना करून एक स्वच्छ व पोषक परिस्थितीची निर्मिती करणे हे एक अत्यंत महत्वपूर्ण व आवश्यक कार्य प्रशासनाचे आहे. या संकटकालीन स्थितीत महापूर, भुकंप, कोरडा दुष्ज ाळ, वादळ-वारे, मारामारी, सांप्रदायिक दंगली, दहशतवाद, अपघात इत्यादींचा समावेश होतो. अशा प्रकारची कोणतीही घटना घडल्यास सर्व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व यंत्रणा त्याच्या निवारणात गुंतलेल्या असतात. प्रत्येक परिस्थितीत त्यांचा सामना केला जातो. संकटकाळात गरज पडल्यास सैन्यांची मदत घेतली जाते. शासन आणि अन्य संघटनामार्फत उपलब्ध होणाऱ्या सहाय्यतेचा योग्यप्रमाणे प्रशासनातर्फे वापर संकटग्रस्त लोकांमध्ये योग्यरित्या वितरीत केल्या जातात. या दरम्यान इतर सर्व लोककल्याण व विकास कार्य ठप्प पडतात.

विकास प्रशासनाची दशा सुधारण्यासाठी दिशाः

भारतीय प्रशासकीय व्यवस्थेत विकास प्रशासनाची भूमिका अधिक महत्वपूर्ण आहे. लोककल्याणकारी व विकास संकल्पनेस स्वीकारण्यासाठी त्याचे दायित्व व कार्यात अत्याधिक वाढ झाली. लोज ल्याण व राष्ट्रीय विकासाच्या ध्येयास साध्य करण्यासाठी प्रशासनास कुशल, प्रभावी, पारदर्शक, जबाबदार, लोकसहभागी व संवेदनशील बनवणे आणि भ्रष्टाचारावर अंकुश लावणे अत्यंत आवश्यक आहे. वर्तमान परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी आणि विभिन्न प्रकारच्या समस्यांचे उपायासाठी कांही महत्वपूर्ण उपाय प्रस्तुत केले आहेत ते पुढीलप्रमाणे.

१) आजचे युग माहिती व तंत्रज्ञानाचे आहे. वर्तमान परिप्रेक्ष्यात ई-शासन अधिक सार्थक सिध्द होत आहे. त्यास प्राधान्य देणे आवश्यक आहे. शासकीय कार्यालयात अभिलेखाचे शीघ्रातिशिघ्र संगणकीकरण करणे आवश्यक आहे. ज्यामुळे माहितीचे संचलन करण्यासाठी कर्मचाऱ्यांवर अवलंबून राहावे लागत नाही. अशी आशा केले जाते की, सार्वजनिक कार्यालयात एकावेळेस माहिती व तथ्यांचे संगणकीकरण होईल ते आम जनतेशी संबंधित कार्य निष्पादन व तक्रार निवारणात लागणारा वेळ कमी होते. याशिवाय त्याच्या कार्यात पारदर्शकता व जलदता आली. भ्रष्टाचारावर अंकुश लावून तसेच सर्व क्षेत्रातील स्वराप्रमाणे प्रविष्ट लालफीतशाहीच्या प्रभावास कमी करता येते.

२) भारतीय प्रशासकीय व्यवस्थेत वाढता भ्रष्टाचार दिवसें-दिवस प्रशासनास कमकुवत बनवत आहेत. भ्रष्टाचाराच्या समस्येपासून निपटारा पाण्यासाठी प्रत्येक व्यक्तिला व्यक्तिगत स्तरावर प्रयत्न करावे लागतील. या समस्या लोकांच्या मानसिकतेशी निजडीत आहेत. त्याचे समाधान तेंव्हाच शक्य आहे, जेंव्हा भ्रष्टाचारास एक चरित्रात्मक बुराई मानले जाईल. तसेच भ्रष्ट तत्वास खुलेआम बेनकाब करण्यासोबत त्यांना कठोरतेने दंडीत करावे लागेल.

३) प्रशासज ीय अधिकाऱ्यांना नियामक आणि विकास कार्य दोन्हींत महत्वाची भूमिका बजवावी लागते. या कार्याच्या योग्य निष्पादनात अधिकाऱ्यांच्या वारंवार होणाऱ्या बदल्या अडथळे आहेत. यामुळे जिल्हा विकास प्रशासनावर अधिक वाईट परिणाम पडतो. शासनामार्फत मंत्र्यांना प्राप्त स्थलांतराच्या अधिकारांवर कांही आवश्यक नियंत्रण स्थापित करावे. स्थलांतरांशी संबंधित मंत्र्यांची जबाबदारी सुनिश्चित करावी. ज्यामुळे प्रतिरोध ज्ंिवा स्वार्थपुर्ततेच्या भावनेतून होणाऱ्या अयोग्य स्थलांतरावर प्रतिबंध लावता येईल.

४) प्रशासकीय सुधारणांसाठी गठीत झालेले आयोग व समितीद्वारा जे महत्वपूर्ण सल्ले दिले. त्यास शासनाने विनाविलंब पूर्ण तत्परतेने लागू करावे. या सल्ल्यांची अंमलबजावणी करतेवेळी जर शासनास कठोर निर्णय घ्यावे लागले तरी शासनाने मागे सरु नये.

५) लोककल्याण व विकासशील कार्याला योग्यरित्या निष्पादित ज रण्यासाठी प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सतत प्रभावी प्रशिक्षण द्यावे. त्यामुळे कुशल, क्षमता, दृढता, व्यावहारिक, प्रभावशीलतेत उत्तरोत्तर वृध्दि होते. ज्याचा स्पष्ट प्रभाव परिणाम व सेवांचे परिलक्षण होते. याशिवाय उत्कृष्ट कार्याच्या आधारावर बढती आणि कार्य उपलब्धी सुनिश्चित करुन त्यांच्या ध्येयाप्रती जागरुक बनवले पाहिजे.

६) माहितीचा अधिकार वास्तवतेत नागरिकांसाठी बनवण्यात आलेला व्यापक कायदा आहे. जो शासकीय अधिकाऱ्यांना सुचना प्राप्त करण्यासाठी त्यांना कायदेशीर आधार देते. प्रशासनास पारदर्शक, संवेदनशील व उत्तरदायी बनवण्याची दिशेत माहिती अधिकार मोलाचा दजड सिध्द झाला. फक्त त्याचे प्रभावी अंमलबजावणी आणि प्रचलन सुनिश्चित करावे. यास योग्य पध्दतीने काम करण्यासाठी अधिकाऱ्यांना प्रशिक्षित व जनतेस अधिक जागरुक बनवण्याची आवश्यकता आहे.

७) शासनामार्फत विकास कार्यक्रमांना लागू करतेवेळी विभिन्न प्रसार माध्यमांद्वारा त्यांचा व्यापक प्रचार व प्रसार होणे आवश्यक आहे. जेणेकरुन लोकांपर्यंत कार्यक्रम पोहचेल. जनतेत या कार्यक्रमांना घेवून जागरुकता व अभिरुची निर्माण होते. यामुळे या कार्यक्रमात जनतेची सक्रिय सहभागीत्व मिळविण्यास शक्य होते. योजनांच्या

अंमलबजावणीत सफलता मिळावी जेंव्हा अधिकाधिक लोकांना त्यातून सहभागीत्व मिळेल.

८) ग्रामीण विकासाच्या विभिन्न योजना व कार्यक्रमाच्या आजपर्यंतच्या उपलब्धीचे मुल्यांकन केल्यास हा निष्कर्ष निघेल की, त्यांचा संपूर्ण लाभ ग्रामीण भागापर्यंत अजूनपर्यंत पूर्णतः पोहचला नाही. याबाबत अथक संशोधन व अभ्यास आवश्यक आहे. या योजना व कार्यक्रमातील भ्रष्टाचाराला रोखण्यासाठी शासनास सतत मूल्यांकनाची योग्य व्यवस्था करावी लागेल.

९) पंचायत राज संस्थांना सक्षम बनवण्यासाठी त्यात निर्वाचित लोकप्रतिनिधींना योग्य प्रशिक्षण देण्यासाठी अभियान चालविण्याची गरज आहे. जेणेकरुन त्यांना आपल्या अधिकाराचे ज्ञान होईल. त्याच्या वापरासाठी दक्ष व प्रभावी बनतील. यामूळे स्थानिक प्रशासकीय यंत्रणेवर पंचायतीराज संस्थांची पकड मजबुत होईल.

१०) लोककल्याण व विकास कार्याचे संपादन करतेवेळी प्रशासनाने राजकारण्याचा अयोग्य हस्तक्षेप व दबावात येवू नये प्रशासकीय अधिकाऱ्यांनी योग्य व विवेकी विचार, परिपक्वता, व्यवहार कुशलता व दूरदर्शीपणाचा परिचय देवून जनतेच्या सहकार्याने कार्यास पूर्ण करावे. कोणत्याही परिस्थितीत त्यांनी आपले धाडस व हिम्मत ढळु देवू नये. चांगला उद्देश व निस्वार्थ भावनेने लोककल्याण व विकासासाठी होणाऱ्या प्रयत्नाचे त्यांना योग्य परिणाम मिळतात.

११) जोपर्यंत देशातील अधिकाधिक लोक अशिक्षित गरीब आणि आपले अधिकार व कर्तव्याप्रती अज्ञान असतील तोपर्यंत विकास कार्यातील त्यांचे संपूर्ण योगदान मिळत नाही. त्यामुळे जनतेला त्यांचे अधिकार व कर्तव्याची माहित्ती देण्यासाठी सुशिक्षित करणे महत्वाचे ठरते. कांही विशेष कार्यक्रम उदा : अनौपचारिक शिक्षण, कुटूंब कल्याणाच्या संपूर्ण अंमलबजावणीत पंचायती शिवाय प्रतिष्ठित व उत्तरदायी स्वंयसेवी संस्था व समाजसेवी संघटनांनी उत्स्फुत सहकार्य द्यावे. ज्यामुळे अधिकाधिक जनसहकार्य मिळते. या कार्यक्रमांची यशस्वीता वाढते. दृढ इच्छाशक्तीमुळेच प्रशासकीय अधिकारी आवश्यक जनसहकार्यांत मदत करण्यात यशस्वी होतात.

१२) योजनांच्या अंमलबजावणीशी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना जबाबदार बनवण्यासाठी विभिन्न स्तरावर पूनर्गठण करुन एक अशी व्यवस्था बनवण्याची गरज आहे. जेथे प्रत्येक कार्याची जबाबदारी निश्चित होईल. याशिवाय आपल्या दायित्वाप्रती सकारात्मक दृष्टीकोण स्वीकारणे प्रत्येक नागरिकास विकास कार्यात उत्साहपूर्वक सहभागी व्हावे लागेल. तसेच प्रशासनास पुष्कळ सहकार्य करावे लाजेल.

१३) नागरिकांना या सर्व सुविधा प्रदान कराव्यात ज्यासाठी आपला अमुल्य पैसा शासनास आपण कराच्या माध्यमातून देतो. त्याचा सदुपयोग व्हावा. सुशासनास व्यवहारात आणण्यासाठी लोकांच्या मुलभूत आवश्यकता पूर्ण होण्यासाठी लोकसत्तेत अथवा ज्यांना अधिकार आहेत. त्यांनी आपल्या दायित्वाचे योग्य निर्वाहन करावे. आम्हास एक कार्यकुशल, जनताप्रेमी व कार्याचे योग्य संपादन करणाऱ्या नोकरवर्गाची आवश्यकता आहे.

१४) कोणतेही शासन तेंव्हाच पारदर्शक व संवेदनशील म्हणवले जाते. जेंव्हा त्यांचे सर्व कर्मचारी जनकल्याणाच्या ध्येयाने प्रेरित होवून कार्य करतील. सुशासनास शासनाच्या अजेंड्यात प्राथमिकता असावी. प्रशासनात जबाबदार व पारदर्शक कार्यप्रणाली विकसित करण्यासाठी जुने व किचकट कायदे व नियमांच्या ऐवजी सरळ, साधे नियम व कायदे बनवावे.

१५) विकासाचा उद्देश व ध्येयांना प्राप्त करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेची कार्यकुशलता व क्षमता वाढवणे अत्यंत आवश्यक आहे हे फक्त तेंव्हाच शक्य होवू शकते, जेंव्हा प्रशासनात व्यापक स्तरावर सुधारणा होतील. यासाठी प्रशासनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, प्रशासकांच्या मनोवृत्तीस बदलणे, प्रशासकाच्या भूमिकेस अधिकाधिक उत्तरदायी बनवणे, प्रशासनात संशोधन व विकासावर भर द्यावा लागेल. याशिवाय इ-गव्हर्नन्सला अधिक अधिक प्रोत्साहन देणे ही वेळेची मागणी आहे.

१६) भारतीय प्रशासकीय लोकसेवकांच्या येथेत प्रतिस्पर्धा आणण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा ज्यामुळे लोकसेवक तत्परतेने कार्य करतील. राष्ट्र बांधणीची काळजी करतील. विभिन्न स्तरावरील भ्रष्टाचाराचे जाळे या प्रशासकांचीच करतो आहे. शासनाने पुढाकार घेवून योग्य लोक सेवकास पुरस्कारित करावे. तसेच चुकीच्या कार्यात व्यस्त असणाऱ्या लोकसवेकास कठोरात कठोर दंड द्यावे.

१७) जर शासन, स्वयंसेवी संस्था आणि संवेदनशील समाजासहित सक्रिय सहकार्य देवून नैसर्गिक पिडीतांना, त्रासमुक्त करण्याचे काम करावे लागेल. परंतु पुनर्वसनाच्या मोर्च्यावर हे सर्व विफल होते. शासनास पुनर्वसनाच्या संबंधाने कांही विशेष पाऊल उचलण्याची आवश्यकता आहे. सर्वसामान्यतः विभिन्न प्रसार माध्यमातून नैसर्गिक संकटाप्रती अधिकाधिक जागरुकता व सतर्कता निर्माण करण्यावर भर द्यावा लाजेल. याशिवाय विभिन्न अपत्कालीन विभाग उदा : प्रशासन, पोलिस, माहिती, परिवहन, दवाखाने ई. तज्ञ या सर्वांसोबत योग्य समन्वय निर्माण करणे अधिक गरजेचे आहे.

संपूर्ण वातावरणातील बदलत्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, प्रशासकीय, तंत्रज्ञानात्मक घटकांचा विचार करता सर्व संस्थांना आपल्या कार्यशैलीत निरंतर सकारात्मक बदल करावा लागेल. अशा कार्य पध्दती, तंत्रज्ञान व कार्यसंस्कृतीचा विकास करावा लागेल जे प्रभावी, दक्ष आणि सक्षम असतील. या सर्वांस तेंव्हाच वास्तवरुप मिळेल जेंव्हा कार्यरत व्यक्तिचे सहभागीत्व, वचनबध्दता, जबाबदारी, पारदर्शकता, क्षमता, विकास, अधिकारांचे विकेंद्रीकरण, निर्णय घेण्याची स्वायत्तता ई. सुनिश्चित होईल. कोणी व्यक्ती अथवा व्यवस्थेचा भुतकाळातील ईतिहास कितीही वाईट असला तरी त्यात सुधारण्याची संधी असेल तर तो जेंव्हा पाहिजे तेंव्हा त्याचा आरंभ करुन स्वतःचे आणि आपल्या राष्ट्राचे वर्तमान व भविष्य उज्वल करु शकतो. त्यासाठी गरज आहे फक्त सुधारण्याची संध देण्याची व मिळालेल्या संधीचा वापर समज व राष्ट्राचा विकासासाठी करावा, न की स्वतः साठी.

संदर्भ ग्रंथः


१. डॉ.ए.जी.अवस्थी-लक्ष्मीनारायण अग्रवाल, आगरा.
२. लोक प्रशासन-राजकौर जयपूर, आर.बी.एस.ए.पब्लिशर्स, जयपूर.
३. लोकप्रशासनातील नवप्रवाह-डॉ.प्रीती पोहेकर-अरुणा प्रकाशन, लातूर.
४. लोक प्रशासन पत्रिका-जानेवारी-जून-२०१५-संपादक-शाम शिरसाठ.
५. Elements of Development Administration-Theory and Practice-P.B.Rathod.
६. Bureaureary and Public Administration-Rajeshwar Patrika-ABD Publishers, Jaipur
७. Politics and Bureaucratic Administration-P.B.Rathod-Jaipur.
८. Development Administration-Anter Singh, Shree Publishing House-Delhi.
९. Development Administration Inacharging Society-R.D.Sharma.




Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded